आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

दिनांक २५ डिसेंबर २०२४

ठळक बातम्या

- देशभरातल्या अटल सुशासनभवनांच्या पायाभरणीसह विविध विकासकामांचं पंतप्रधानांच्या हस्ते भूमीपूजन आणि लोकार्पण
- नक्षलवादाविरोधात निकराची लढाई करण्याचा ख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात व्यक्त केला निर्धार
- येत्या 27 डिसेंबर तारखेला दुपारी साडेबारा वाजता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वामित्व योजनेचा शुभारंभ करणार- महसूलमंत्री बावनकुळे यांची नागपुरात माहिती
- एप्रिल ते ऑक्टोबर २०२४ कालावधीत निर्यात क्षेत्रात अमरावती विभागात बुलढाणा जिल्हा अव्वल

माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी शतक महोत्सवी जयंती माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांची शतक महोत्सवी जयंती आज साजरी होत आहे. या निमित्तानं दिल्लीत सदैव अटल या त्यांच्या समाधीस्थळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पुष्पांजली अर्पण करून, अटलजींच्या स्मृतिंना अभिवादन केलं. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, अटलजींच्या दत्तक कन्या नमिता भट्टाचार्य यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.अटलजींच्या जयंतीनिमित्त सुशासन दिवस आज पाळण्यात येत आहे. परंतु भाजपा सरकारसाठी सुशासन ही संकल्पना एका दिवसापुरती मर्यादित नसून तीच सरकारची खरी ओळख असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. मध्य प्रदेशात खजुराहो इथं आयोजित कार्यक्रमात देशभरात एक हजार,१५३ अटल ग्राम सुशासन भवनांची पायाभरणी आज प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते झाली.त्यावेळी ते बोलत होते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या समृतीप्रीत्यर्थ एका टपाल तिकिटाचं तसंच विशेष नाण्याचं प्रकाशनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पातल्या पहिल्या नदीजोडणीच्या कामाची पायाभरणी मोदी यांच्या हस्ते झाली. मध्य प्रदेशात केन आणि बेतवा या दोन नद्यांची जोडणी करण्यात येणार आहे. या विविध विकासकामांमुळे मोठ्या प्रमाणावर

रोजगार निर्मिती होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती 'सुशासन दिन' म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्या वतीन अभिवादन केल. भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्तान गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था आणि अमरावती जिल्हा अथलेटिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आज अमरावती मध्ये भव्य राज्यस्तरीय मॅरेथॉन स्पर्धाच आयोजन करण्यात आल.याशिवाय नागपुर महावितरणतर्फ़े देखील त्यांना अभिवादन करण्यात आल.

नाताळ

भगवान येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस ख्रिसमस अर्थात नाताळ आज साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर सर्वत्र उत्साहाचं वातावरण आहे, छत्रपती संभाजीनगर सह विविध ठिकाणी चर्चच्या प्रांगणात येशू जन्माचे देखावे साकारण्यात आले असून, चर्च परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. कॅरोल गायनासह अनेक कार्यक्रमांमध्ये ख्रिस्ती बांधव मोठ्या उत्साहान सहभागी होत आहेत. नागपुरातील विविध गिरीजा घरांमध्ये उत्साहात नाताळ साजरा होत आहे.

अमित शहा

दहा हजारांपेक्षा जास्त बहुउद्देशीय कृषी प्राथमिक सहकारी संस्थांचं तसंच दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचं लोकार्पण आज केंद्रिय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते करण्यात आहे. सहकारी संस्थांच्या राष्ट्रीय परिषदेत या नव्या संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र, रुपे किसान क्रेडिट कार्डस आणि मायक्रो एटीएम देखील शहा यांच्या हस्ते आज वितरित आल. यामुळं ग्रामीण भागातल्या नागरिकांना विविध योजनांचा लाभ घेणं सोपं होईल.

देवेंद्र फडणवीस पत्रकार परिषद

नक्षलवादाविरोधात निकराची लढाई करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते आज नागपूर इथं एका पत्रकार परिषदेत बोलत होते. गडचिरोली ही भारताची दुसरी स्टील सिटी होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मागच्या कार्यकाळात आपण विदर्भात सिंचनाचे 80 प्रकल्प पूर्ण केले याशिवाय पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्राचे प्रकल्प देखील पूर्ण केले. ऊर्जा विभागाचा मंत्री म्हणून त्या क्षेत्रातल्या पुढच्या पंचवीस वर्षाचा रोड मॅप तयार असल्याचा उल्लेख त्यांनी केला. पुढच्या दोन वर्षात उद्योगासहित सर्वच प्रकारच्या विजेचे दर कमी करता येतील, अशी व्यवस्था निर्माण करण्यावर आपला भर असल्याची माहिती त्यांनी दिली.विधानसभा निवडणुकीत जनतेने बहुमत दिलं त्याबरोबर अपेक्षाही आल्या आहेत आणि आपली जबाबदारी वाढली आहे असं ते म्हणाले.....

***<u>अत्यंत डीसेन्सिव्ह अश्या प्रकारचं  मॅनडेड  हे जनतेने आम्हाला दिलेलं आहे अर्थातच एवढं चांगलं मॅनडेड  मिळाल्यामुळे आमचीच जबाबदारी खूप मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. कारण कुठलंही मॅनडेड हे जनतेच्या अपेक्षा घेऊन येत असत. अपेक्षा असता आणि काम करत असताना काही अडचणी असतात कधी काही  मर्यादा असता, तर या अडचणी आणि  मर्यादा आम्ही बाद  करून जनतेच्या मनातली काम झाली पाहिजे तश्या प्रकारचा भारत आज तयार झाला पाहिजे हा प्रयन्त आपल्याला या ठिकाणी करायचा आहे.</u>***

सहा नदीजोड प्रकल्पांमुळे महाराष्ट्राचा कायापालट होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. हमीभावासंदर्भात इतर राज्यांच्या धोरणाचा अभ्यास केला जाईल असं सांगून कापूस आणि सोयाबीन यासह अन्य पिकांच्या खरेदीत सुलभता आणण्याचा सरकारचा विचार असल्याचं ते म्हणाले.. पीएम आवास योजनेअंतर्गत एका वर्षात विक्रमी संख्येने वीस लाख घरे देण्यात येत आहेत असं त्यांनी यावेळी नमूद केलं.

राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

राज्यात विपूल प्रमाणात उपलब्ध असलेली खनिज संपदा लक्षात घेता याचे योग्य ते कालसुसंगत व्यवस्थापन आणि  पर्यावरण समतोलाच्या दृष्टीकोनातून अधिकाधिक विचार झाला पाहिजे. भूविज्ञान आणि  खनिजकर्म संचालनालयातील वरिष्ठ संशोधकांनी यावर अधिक लक्ष केंद्रीत करुन नवनवीन संधी या क्षेत्रात कशा घेता येतील याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार आणि  खनिजकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.डॉ. पंकज भोयर यांनी आज नागपूरच्या  भूविज्ञान आणि  खनिकर्म संचालनालय कार्यालयास

सदिच्छा भेट देऊन आढावा घेतला. खनिज क्षेत्रात असलेल्या रोजगाराच्या संधी आपण लक्षात घेतल्या पाहिजे. याच बरोबर या क्षेत्राशी निगडीत होणारा औद्योगिक विस्तार, भविष्यातील संधी या लक्षात घेऊन त्याच नियोजन असण आवश्यक असल्याच ते म्हणाले. संचालनालयाअंतर्गत उपलब्ध मनुष्यबळ, मंजूर पदे आणि रिक्त पदे याबाबतचा आढावा त्यांनी घेतला. यावेळी राज्यात प्रामुख्यान चंद्रपूर, नागपूर, भंडारा, यवतमाळ या जिल्ह्यांतर्गत सुरू असलेले अन्वेषण प्रकल्प, लाईमस्टोन, गोल्ड, कॉपर, बॉक्साईट, आयरन या खनिजांचा समावेश असलेले प्रकल्प आणि त्याची राबविण्याची कार्यप्रणाली याबाबत त्यांनी माहिती करुन घेतली.

बावनकुळे

येत्या 27 डिसेंबरला दुपारी साडेबारा वाजता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी 'स्वामित्व योजनेचा' शुभारंभ करणार आहे. संपूर्ण देशभराच्या सर्व जिल्ह्यांमध्ये डिजिटल पद्धतीन जिल्हाधिकारी जिथ ठरवतील त्या स्थळावर ऑनलाईन माध्यमान हा कार्यक्रम होणार आहे. याशिवाय पंतप्रधान मोदी साडेबारा वाजता जनतेला संबोधित देखील करतील अशी माहिती भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात दिली. ते म्हणाले की.......

***स्वामित्व योजना म्हणजे खरं तर आपण बघितलं की आपण की आपणही आपल्या ग्रामीण महाराष्ट्रात राहणार लोक आहोत ,की जमिनीवर वाद विवाद, मालकी हक्कावर वादविवाद, नागरिकांना त्यांच्या मालकीचे पट्टे नसल्यामुळ त्याच प्रॉपर्टी कार्ड नसल्यामुळ कळत न कळत कुणीही कब्जा करते लुबाडणूक करत फसवणूक करत आणि म्हणून वाडीलोपार्जित शेकडो वर्षाच्या जमिनी घर डिजिटल पद्धतीने त्याच कार्ड प्रतेक नगरिकांकडे शेतकरांकडे असल पाहिजे तर या कार्यक्रमाची सुरवात होत आहे***

महाराष्ट्राचे जवळपास तीस हजार पाचशे पंधरा गावं या योजनेमध्ये डिजिटल होणार आहे. त्यांना डिजिटल प्रॉपर्टी कार्ड मिळणार आहे. गाव पातळीवर नकाशे उपलब्ध करण, बांधकाम परवानगी मिळवण यामुळे सोप होणार आहे. पुढच्या पिढीला देखील या डॉक्युमेंटेशनचा लाभ होणार आहे. त्या माध्यमातून गावाची आर्थिक पत सुद्धा वाढेल. गृह कर्ज घ्यायचं असेल तरीही हे कार्ड वापरता येईल.

## क्षयरोग दूरीकरण

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत अमरावती जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यातील सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहीम 23 डिसेंबरपासून सुरूवात झाली आहे. मोहिमेसाठी नागरिकांनी सहकार्य कराव, अस आवाहन करण्यात आल आहे. या मोहिमेंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील अति जोखमीच्या भागांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. क्षयरोगाची तपासणी करून त्यामध्ये पॉझिटिव्ह आल्यास त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येणार आहे.

## गुणसंवर्धित तांदूळ

भंडारा जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीन शासनातर्फे राबविण्यात येणा-या सार्वजनिक वितरण व्यवस्थेव्दारे २०२३ पासून सर्व लाभार्थ्यांना गुणसंवर्धित तांदळाचा मोफत पुरवठा केला जातो. या गुणसंवर्धित तांदळामध्ये फोलीक ॲसिड, लोह, विटामिन या पोषक तत्वाचा समावेश केला असुन लोकांचे आरोग्यमान उचांवण्यासाठी सर्व लाभार्थ्यांनी त्यांच्या आहारामध्ये गुणसंवर्धित तांदळाचे विविध पदार्थ खावे. आहारात विविधता आणण्याबाबत उपस्थितांना विशेष करून महिला बचत गटाच्या सदस्यांना आवाहन केले.ग्राहकांना जागरुक करण्याच्या दृष्टीकोनातुन तसच गुणसंवर्धित्त तांदळाच्या फायदयाचा प्रचार प्रसार करण्यासाठी पथनाटयाचे आयोजन करण्यात आले.

## बुलढाणा अव्वल

यंदाच्या २०२४-२५ च्या आर्थिक वर्षातील एप्रिल ते ऑक्टोबर २०२४ कालावधीत निर्यात क्षेत्रात अमरावती विभागात बुलढाणा जिल्हा अव्वल ठरला आहे. या काळात बुलढाणा जिल्ह्यातून ४६५.१८ कोटी रुपयांच्या उत्पादनांची निर्यात झाली आहे.उद्योजकांनी बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक करून रोजगार निर्मिती सोबत जिल्ह्याच्या विकासासाठी योगदान द्याव, अस आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केल आहे.

सेवा केंद्र

भंडारा जिल्ह्यातील मेंढेगाव इथे विद्यार्थी आणि नागरिकांना मागील तीन वर्षांपासून आधार कार्ड करता नागपूर ,भंडारा किंवा पवनी इथं चकरा माराव्या लागत आहे.

सध्या दहावीच्या बोर्डाचे फॉर्म भरण्याकरता आधारकार्डची आवश्यकता असल्यान विद्यार्थ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवावे  लागत आहे . मेंढेगावच्या नागरिकांनी त्वरित सरकारी सेवा केंद्र उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

कृषि प्रदर्शनी

डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि विभाग व आत्माच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंती निमित्य राज्यस्तरीय कृषि प्रदर्शनीच आयोजन दिनांक २७ ते २९ डिसेंबर दरम्यान अकोला येथे विद्यापीठाच्या किडांगणात आयोजित करण्यात आल आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रदर्शनीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तिनही दिवस कृषि प्रदर्शनी सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत सुरू राहणार आहे. या प्रदर्शनीत फळबाग, भाजीपाला, फुलशेती, वनौषधी, कापूस, ज्वारी, गहू, कडधान्य, तेलबिया, पाणलोट विकास, ऊस, पशुसंवर्धन,  दुग्ध व्यवसाय, कृषि अभियांत्रिकी ईत्यादी विभागाची दालने तसेच ईतर संलग्न संस्थासह, कृषि निविष्ठा आणि  कृषि औजारे यांची दालने सुध्दा राहणार आहे. तसेच शास्त्रज्ञ शेतकरी सुसंवाद, प्रगतीशील शेतकऱ्यांचे मनोगत आणि  मान्यवरांचे संबोधनाचे आयोजन करण्यात आल आहे.

******